# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २७/०५/२०२४ (सोमवार) सायंकाळ**

---

### कोळसा चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

पोस्टे कन्हान अंतर्गत मौजा कामठी डम्पींग राणी बगीचा कन्हान येथे दिनांक २६/५/२०२४ चे ११/३० वा. ते १२/२० वा दरम्यान यातिल **आरोपी नामे– १) शोहन छोटेलाल बाथब, वय ३३ वर्ष, रा. खदान नं ६ कन्हान २) सर्वन सत्यनारायण यादव वय ४० वर्ष, रा. खदान नं. ६ कन्हान ३) सुरज विठ्ठराव वानखेडे, वय ३५ वर्ष, रा. धरम नगर कन्हान ४) पप्पू तिर्थनंद नागापुरे वय २९ वर्ष, रा. धरमनगर कन्हान** हे कामठी डम्पींग राणी बगीचा येथे कोळसा चोरी तसेच लोहा चोरी करतांनी मिळून आल्याने आरोपींच्या ताब्यातून कोळसा ३२० किलो कि. ३२००/– रू (२) लोहा ३१० किलो ९३००/– रू (३) हेक्सा फ्रेम ब्लेड किंमती ३००/– रू (४) एक मोटार सायकल हिरो होंडा सिडी डिलक्स क्र. एम एच –३४/ए एच–३१५० किंमती ३०,०००/– रू (५) मोटार सायकल हिरो होंडा साईन एम एच ३४/एस डब्ल्यु –००२० किंमती ३०,०००/– रू. (६) मोसा बजाज सिटी १०० कंपनीची एम एच–४०/ए वाय– ६९८३ किंमती २०,०००/– रू (७) मोटरसायकल बजाज डिस्कवर कंपनीची १०० क्र एम एच ३१/बी एक्स–१८९४ किंमती २०,०००/– रू असा एकूण १,१२,८००/– रू मुद्देमाल चोरी करतांना मिळून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे कन्हान येथे कलम ३७९, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना कन्हान पोलीसांनी अटक केली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा) यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कन्हान येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक उमेश पाटील, नापोशि महेश बिसने यांनी पार पाडली.

# लोखंडी एंगल चोरी करणारे आरोपी अटकेत

पोस्टे मौदा अंतर्गत मौजा तिडके कॉलेज रोड, ओपोलो टार्यरसचे समोर मौदा येथे दिनांक २६/०५/२०२४ चे ०३.४५ वा. ते ०४.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– अरूण गजानन लांजेवार वय ५६ वर्ष रा. लक्ष्मीनगर गजानन मंदीर जवळ मौदा यांचेकडे रोडचे देखरेखीचे काम दिले असून त्याचे फोनवर माहिती मिळाली की मौजा तिडके कॉलेज रोड जवळ दोन ईसम हे लोहाचे एंगल चोरी करून घेवून बसले आहेत. व त्यांना गावातील लोकांनी पकडून ठेवले आहे. अशा माहितीवरून त्या ठिकाणी जावून बघितले असता लोकांची गर्दी होती व तिथे दोन आरोपी बसून होते. **१) राहूल जगदीश पिल्ले वय २४ वर्ष रा. स्नेहनगर मौदा, २) सुरज सुरेश हिवरकर वय २३ वर्ष रा. लापका मौदा** हे लोहाचे एंगल अंदाजे ६० किलो किंमती ३६००/– रूपयेचे संगणमत करून चोरून नेतांना मिळून आल्याने आरोपींविरूदध पोस्टे मौदा येथे कलम ३७९, ५११, ३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद केला असुन दोन्ही आरोपीतांना मौदा पोलीसांनी अटक केली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा) यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे मौदा येथील ठाणेदार सतिशसिंग राजपूत, पोहवा अनि कोकोडे, संदीप नागोसे, पोशि तेजस राऊत, रोशन तागडे यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**